# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालय

---

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
क्र.मह/आस्था-२/प्र.क्र.२५/आरआर-९८६/२०१७
सोलापूर दिनांक १७/०७/२०१७.

**महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी" हे पद आऊटसोर्सिंग ऑफ रिसोर्स पर्सन म्हणून भरण्यासाठीची जाहीरात**

महाराष्ट्रातील आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयाकरिता **"जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी"** हे पद आऊटसोर्सिंग ऑफ रिसोर्स पर्सन (कंत्राटी तत्वावर) म्हणून भरण्याकरिता **दिनांक ३१/०७/२०१७ रोजी सायंकाळी ५-४५ वाजेपर्यंत** (शासकीय सुट्टी वगळून) इच्छुक व विहीत अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| पदाचे नांव | पद संख्या | कालमर्यादा | ठोक मानधन (दरमहा) | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (District Disaster Management Officer ) | ०१ (एक) | दि.१/०४/२०१७ पासून २ वर्षे किंवा रितसर पद निर्मिती होवून त्यावर नियुक्त्या करणे यापैकी जे आधी घडेल या कालावधीसाठी | रु.३०,०००/- ( अक्षरी रुपये तीस हजार फक्त ) प्रति महिना याव्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी ( सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन ) | (१)आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>(२)मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असणे इष्ट.<br>(३)टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य.<br>(४) उमेदवारास संगणकीय ज्ञान उत्तम प्रकारचे असावे. |

वरील बाबींची पूर्तता होत असल्यास व प्रकल्प हाताळण्याचा पूर्वानुभव असल्यास, अशा उमेदवारांचा सदर पदासाठी विचार केला जाईल.

**<u>सर्व साधारण अटी व शर्ती :-</u>**

(१) भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांची यादी, मुलाखात तारीख व वेळ आणि पात्र उमेदवाराची यादी इत्यादी माहिती जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयाच्या सुचना फलकावर व संकेतस्थळ www.solapur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.

(२) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

(३) उमेदवाराने त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

(४) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताची उमेदवारी/ नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

(५) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी सोलापूर यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

(६) अंतिम निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती द्यावयाचे झाल्यास जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल. उमेदवारास महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात राबविण्याचे जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील आराखडे तयार करणे, विविध अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण व जनजागृती करणे व या कार्यक्रमातंर्गत जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिलेले निर्देशानुसार काम करणे बंधनकारक राहील.

(७) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांत नियुक्तीच्या पदावर स्वखर्चाने हजर होणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल. तसेच निवड सुचीतील प्रतिक्षायादीमधील पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

(८) मुळ प्रमाणपत्र/ कागदपत्रांची खातरजमा केल्यानंतरच उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रूजू करून घेण्यात येईल.

(९) उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर त्यांचे कामकाज असमाधानकारक असल्यास अथवा त्यांच्यासंबंधी अन्य आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

(१०) निवड झालेल्या उमेदवारांस महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सर्व कामकाज / जबाबदारी पार पाडणेची आहे. त्यांना मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते देय नाहीत. तसेच त्यांना रजा अनुज्ञेय नाही.

(११) **विशेष सुचना :-**

(i) उमेदवाराने सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज ए-४ आकाराच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखीत / हस्तलिखीत करून मा.जिल्हाधिकारी सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय (आस्थापना शाखा) सिध्देश्वर पेठ, सोलापूर-४१३००१ या पत्त्यावर जाहीरात प्रसिध्दी झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक ३१/०७/२०१७ पर्यंत सायंकाळी ५-४५** वाजेपर्यंत पोहोचेल अशारितीने पोस्टाद्वारे/ समक्ष पाठवावा. या कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील पात्र अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात **"जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदासाठी अर्ज"** असा उल्लेख करावा. जाहिरात व अर्जाचा नमुना या कार्यालयाचे संकेतस्थळ www.solapur.gov.in वर उपलब्ध आहे.

(ii) जाहिरातीपूर्वी व जाहिरातीलमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त तसेच अपूर्ण, अर्धवट व चुकीचे असलेले अर्ज आणि अर्जामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्याबाबत कोणातही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(iii) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजेच मुलाखतीचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

(iv) पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सुचना फलकावर आणि www.solapur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि दूरध्वनीवरून कळविण्यात येईल.

(v) अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय इत्यादीबाबतचे संपूर्ण अधिकार 'जिल्हाधिकारी सोलापूर' यांनी राखून ठेवला आहेत.

(१२) अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

(i) किमान शैक्षणिक अर्हता व त्यावरील शैक्षणिक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र.

(ii) शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला.

(iii) आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव असलेबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.

(iv) शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

(v) प्रकल्प हाताळण्याचा पुर्वानुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

(vi) अधिवास प्रमाणपत्र.

(vii) लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

सही/-xxx

(डॉ.राजेन्द्र भोसले, भा.प्र.से.)

**जिल्हाधिकारी सोलापूर**

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (District Disaster Management Officer)

या पदासाठी अर्ज.

उमेदवारांनी त्यांचा ओळखपत्र आकाराचा रंगीत फोटो चिटकवून राजपत्रित अधिकाऱ्याने स्वाक्षांकित करून घ्यावा.

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-
(फक्त कार्यालयीन वापरासाठी)

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी सोलापूर,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सिध्देश्वर पेठ,
सोलापूर, पिन-४१३ ००१.

**विषय :-** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (District Disaster Management Officer) पदासाठी अर्ज.

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक क्र.मह/आस्था/२/प्र.क्र.२५/आरआर-९८६/२०१७ सोलापूर, दिनांक १७/०७/२०१७.

आपल्या कार्यालयाची जाहीरात दि.१७/०७/२०१७ ला अनुसरुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदासाठी अर्ज करीत असुन, माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(१) अर्जदाराचे संपुर्ण नांव (आडनाव) (स्वत:चे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव)

मराठी:-

इंग्रजी :-

(२) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिनकोडसह) :-

(३) दुरध्वनी क्रमांक :- मोबाईल क्रमांक :-

(४) अर्जदाराची धर्म व जात :- जातीचा प्रवर्ग :-

(५) लिंग (योग्य रकान्यात ✓ अशी खुण करावी.) पुरूष ( ) स्त्री ( )

(६) जन्म दिनांक (शालांत प्रमाणपत्रानुसार): दिनांक महिना वर्ष

(अ) जन्म दिनांक (अक्षरी) :-

(७) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय ? :-

(८) राष्ट्रीयत्व :-

(९) अर्जदार यांची वैवाहीक स्थिती (योग्य रकान्यात ✓ अशी खुण करावी.) :-    विवाहीत (    )    अविवाहीत (    )

(१०) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र. | उमेदवाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षांचा तपशील) | शाळा/ तांत्रिक विद्यालय/ विद्यापीठ परिक्षा मंडळाचे नाव | विषय | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

(११) पूर्वानुभव (शासकीय / खाजगी कार्यालय) :-

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावधी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(१२) आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव :-

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावधी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

***(टिप :- पुर्वानूभव असल्यास संबंधित कार्यालयाकडील/संस्थेकडील अनुभव दाखला जोडणे आवश्यक राहील)***

(१३) संगणक अर्हता / टंकलेखन तपशील व इतर अर्हता :-

| अ.क्र. | संगणक अर्हता | संस्थेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

(१४) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे काय?    होय/ नाही

जाहीरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्या अटी व शर्तींचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमदेवारी रद्द होईल, याची मी समज घेतली आहे. अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खोटी व चुकीची असल्याचे आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/नियुक्ती रद्द होण्यास पात्र राहील, त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक :- /०७/२०१७ .
ठिकाण :- (उमेदवाराची स्वाक्षरी व नांव)

---

अर्जासोबत जोडलेल्या साक्षांकित कागदपत्रांची यादी

१. ----------------------------------------------------------
२. ----------------------------------------------------------
३. ----------------------------------------------------------
४. ----------------------------------------------------------
५. ----------------------------------------------------------
६. ----------------------------------------------------------
७. ----------------------------------------------------------
८. ----------------------------------------------------------

**प्रतिज्ञापत्र**

नमुना - अ (नियम ४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कुमारी * ------------------------------------------------------------------------

श्री. ------------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/ मुलगी / पत्नी वय ------------

वर्षे ---------- राहणार ------------------------------------------------ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी ------------------------------------------------------------ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला -------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाण :- उमदेवाराचे नाव